


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ   Mob- 9822720784   Email- jansanchlan@gmail.com   RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे   अंक : २८९ वा   शनिवार दि ३१ जानेवारी २०२६   पृष्ठ ८   किंमत ३ रुपये

# राष्ट्रवादीत दिग्गज नेते आणि अनुभवी मंत्री, तरी सुनेत्रा पवारांना उपमुख्यमंत्रिपद का? समोर आलं खरं कारण...

वृत्तसंस्था/मुंबई

अजित पवार यांनी नेतृत्व केलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अनुभवी मंत्री आणि दिग्गज नेते असतानाही महाराष्ट्रातील राजकारणाचा प्रत्यक्ष अनुभव नसलेल्या, प्रशासन हाताळण्याचा वकुब नसलेल्या राज्यसभा खासदार सुनेत्रा पवार यांचेच नाव उपमुख्यमंत्रिपदासाठी चर्चेत का आहे, असा प्रश्न अनेकांना पडला आहे. याचं कारण बहुसंख्य आमदारांनी पक्षाची दोरी कुटुंबातील व्यक्तीकडेच राहावी, अशी मागणी केली आहे. पार्थ पवार अननुभवी असल्याचे तूर्तास सुनेत्रा वहिनींकडेच पक्षाची आणि उपमुख्यमंत्रिपदाची धुरा जाण्याचे संकेत आहेत. आमचे पंचप्राण आणि राजकीय भविष्य असलेले अजितदादा आज आपल्यात नाहीत, हे अजूनही स्वीकारणे कठीण आहे. या पोरक्या झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला सावरण्याची ताकद सुनेत्रा पवारांकडेच आहे, त्यामुळे सुनेत्रा पवार यांनीच राष्ट्रवादीचे नेतृत्व करावे, अशी भूमिका नाशिकमधील राष्ट्रवादीच्या आमदारांनी घेतली आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षाच्या नेतृत्वाबाबत सुरू असलेल्या चर्चांमध्ये सुनेत्रा पवार यांनीच पुढाकार घ्यावा, अशी भूमिका माजी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटेंसह आमदारांनी मांडली आहे. राज्यात सर्वाधिक सात आमदार नाशिक जिल्ह्यातून निवडून आले आहेत. त्यामुळे अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर नाशिकचे आमदार काय भूमिका घेतात, याकडे लक्ष लागून होते. शुक्रवारी (दि. ३०) सायंकाळी सिन्नर नगरपालिकेच्या सभागृहात घेतलेल्या पत्रकार परिषदेत कोकाटेंसह अन्य आमदारांची भूमिका स्पष्ट केली. यावेळी नाशिकरोड-देवळालीच्या आमदार सरोज अहिरे, इगतपुरीचे आमदार हिरामण खोसकर, कळवणचे आमदार नितीन पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विष्णूपंत म्हैसधुणे उपस्थित होते. कोकाटे म्हणाले, दादांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आम्ही कोणतीही अपेक्षा न ठेवता त्यांच्यासोबत उभे राहिलो. आज दादा नसले तरी त्यांचे विचार आणि कार्यपद्धती पुढे नेण्यासाठी त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीनेच पक्षाची धुरा सांभाळावी. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि मुख्यमंत्र्यांशी दादांची झालेली चर्चा सुनेत्रा वहिनींना माहिती असण्याची शक्यता आहे. त्यामुळे सत्तेतील वाटा आणि पक्षाचे नेतृत्त्व त्यांच्या हाती असावे,फअसेही ते म्हणाले. सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपद स्वीकारल्यास राज्यसभेवर कोणाला पाठवायचे, याचा संपूर्ण निर्णयाधिकार सुनेत्रा पवार यांच्याकडेच असावा आणि आम्ही सर्व आमदार त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू, अशी ग्वाही कोकाटे यांनी दिली. पत्रकार परिषदेदरम्यान उपस्थित आमदारांना भावना अनावर झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. अजित पवारांकडे असलेली महत्वाची मंत्रिपदे, राष्ट्रीय अध्यक्षपद तसेच गटनेतेपदाची जबाबदारी सुनेत्रा पवार यांच्याकडेच सोपवावी, असा ठराव करण्यात येणार असल्याचे कोकाटे यांनी स्पष्ट केले. सुनेत्रा वहिनींच्या नेतृत्वावर पक्षातील सर्व ४१ आमदारांचा विश्वास आहे, या संदर्भात मंत्री नरहरी झिरवाळ, दत्ता भरणे, आमदार दिलीप बनकर, किरण लहामटे, आशुतोष काळे, संग्राम जगताप यांच्यासह



बहुतेक आमदारांशी चर्चा झाल्याचेही कोकाटे यांनी सांगितले. राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांचे वय पाहता एकत्र येण्याशिवाय पर्याय नाही, अशी भूमिका मंत्री नरहरी झिरवाळ यांनी मांडली आहे. गेल्या काही दिवसांपासून अजितदादा आणि शरद पवार यांच्यात बैठकाही होत होत्या. तर, अध्यक्ष म्हणून सुनील तटकरे निर्णय घेतील, पण दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्या तर देशपातळीवर अजित पवार यांच्या जागेवर सुप्रिया सुळे असतील किंवा प्रफुल पटेल असतील. कारण देशात ज्यांनी काम केले आहे, त्यांनाच पुढे केले जाईल, असेदेखील झिरवाळ यांनी सांगितले. तर, दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याचा निर्णय पवार कुटुंबच घेईल, असे कोकाटे यांनी म्हटले आहे.

# अजितदादांच्या जाण्याने शरद पवार भावुक; पुतण्याचं तोंडभरून कौतुक, म्हणाले अजित आज असते तर

वृत्तसंस्था/बारामती

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज बारामती येथे दुसरी पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते अत्यंत भावुक झाले होते. अजित पवार यांच्या नेतृत्वगुणांचे आणि कार्यपद्धतीचे त्यांनी मनापासून कौतुक केलं. आज अजित जिवंत असते, तर ते घरी बसले नसते, ते फिल्डवरच काम करत असते, असे भावनिक उद्गार त्यांनी काढले. शरद पवार म्हणाले की, अजित पवार हे कर्तृत्ववान नेते होते. संघटनेत काम करताना त्यांनी नेहमीच सामान्य जनतेशी थेट संवाद साधला. लोकांचे प्रश्न समजून घेणे, त्यावर माहिती घेणे आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे, हेच अजित पवारांचे वैशिष्ट्य होते. प्रत्येक व्यक्तीचे समाजासाठी काही ना काही योगदान असते. अजित अनेक वर्षे संघटनेत सक्रिय राहून लोकांच्या प्रश्नांसाठी झटत राहिले. त्यांची कामाची सुरुवात पहाटेच होत असे. कामात कधीही त्यांनी कमतरता दाखवली नाही, अशा शब्दांत शरद पवार यांनी आपल्या भावना मांडल्या. अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी बारामती येथे विमान अपघातात निधन झाले. त्यांच्या अकाली जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणाला मोठा धक्का बसला असून, या घटनेमुळे राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कर्तृत्ववान व्यक्तीचे जाणे हा संपूर्ण महाराष्ट्रावर झालेला मोठा आघात आहे. या दु:खद परिस्थितीला सामोरे जावे लागणार आहे. लोकांचे दु:ख कमी करण्यासाठी आम्हाला अधिक जोमाने काम करावे लागेल. यापुढे नव्या पिढीवर जबाबदारी अधिक वाढली आहे, असे शरद पवार यांनी यावेळी नमूद केले दरम्यान, अजित पवारांच्या निधनानंतर, राष्ट्रवादीचे विधिमंडळ पक्षनेतेपद कुणाकडे जाईल, उपमुख्यमंत्री कोण होईल याबाबत चर्चा सुरू आहे. राष्ट्रवादीची नेतेमंडळी मुख्यमंत्र्यांच्या भेटीगाठी घेत आहेत. यासंदर्भात भाजपची नेमकी भूमिका काय, असा प्रश्न विचारला असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, ङ्कुठलाही निर्णय घ्यायचा असेल, तो राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष घेईल आणि त्यांनी घेतलेल्या निर्णयाच्या पाठीशी आम्ही सरकार म्हणून आणि भाजप म्हणून ठामपणे उभे राहू. त्यामुळे अजितदादांचे कुटुंब असो किंवा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असो; त्यांच्या पाठीशी आम्ही पूर्णपणे उभे आहोत. त्यांचा जो काही निर्णय होईल, त्याला योग्य ते समर्थन आमच्याकडून दिले जाईल, असं फडणवीसांनी काल स्पष्ट केलं आहे.

# आम्हा घरी धन डेटाचीच रत्ने...



एकविसाव्या शतकात डेटा हा केवळ संपत्ती नव्हे, तर डिजिटल संक्रमणाचा प्राणवायू झाला आहे. विसाव्या शतकात खनिज तेलाला जे महत्त्व प्राप्त झाले, तसेच वलय या शतकात डेटाभोवती निर्माण होत आहे. परंतु आयुष्याला गती आणि प्रकाश देणाऱ्या तेलाशी एका बाबतीत मात्र हा डेटा फारकत घेतो. तेलसाठे मर्यादित आहेत, तर डेटा मात्र अद्याप तरी अशा कोणत्या बंधन किंवा मर्यादांत अडकण्याची चिन्हे नाहीत. त्याचा आकार, व्याप्ती आणि गती दिवसेंदिवस वाढतच आहे. डिजिटल संक्रमणामुळे मानवी आहार-विहार आणि वर्तन-व्यवहारांच्या बहुतेक कक्षांमध्ये डेटाने प्रवेश केला आहे. ज्याच्या निर्मितीला आपण बहुतेक जण २४ तास कारणीभूत ठरतो, ज्याचे पुरवठादार आणि ग्राहकही आपणच होत आहोत, ती ही दोन अक्षरी जादू आहे तरी काय आणि तिचे महत्त्व, परिणाम-दुष्परिणाम व सुरक्षितता का आणि कशी महत्त्वाची आहे, हे समजून घ्यायला हवे. त्या संदर्भाने काही आकडेवारीवर नजर टाकू. २००३पर्यंत जगात दोन एक्झाबाइट (एक एक्झाबाइट म्हणजे एक अब्ज गिगाबाइट -जीबी) एवढ्या डेटाची उलाढाल झाली होती, जी सध्या दिवसागणिक होत आहे!

२०२४मध्ये जगाने १४९ झेटाबाइट्स (एक झेटाबाइट म्हणजे एक हजार एक्झाबाइट) एवढ्या डेटाची उलाढाल केली. जगात आजवर निर्मिती झालेल्या डेटापैकी ९० टक्के हा फक्त २०२३ आणि २०२४ या दोन वर्षांतील आहे आणि दर चार वर्षांनी त्यात दुपटीने भर पडत जाणार आहे! डेटाचा वापर व व्याप्ती वाढेल तसे त्याच्या जोखमींचे धोकेही वाढत आहेत. त्यामुळे डिजिटल संक्रमण जबाबदारीने पार पाडण्यासाठी या परिसंस्थेतील सर्व घटकांना काही पावले उचलावी लागत आहेत. ई-मेल किंवा मेसेजमधून दिशाभूल करून गोपनीय माहिती मिळवणे (फिशिंग), सायबरचाचेगिरी करून संगणक यंत्रणा ठप्प करून त्या चालू करण्याच्या बदल्यात खंडणी उकळणे (रॅनसमवेअर), बनावट संगणक प्रणाली वापरण्याला उद्युक्त करून मागील दाराने संगणक यंत्रणात घुसखोरी करणे अशा अनेक मार्गांनी हे हल्ले होतात. यामध्ये तो माहितीसाठा हाताळण्याचे अधिकार असणाऱ्या व्यक्तीच सहभागी होतात. यामध्ये बेजबाबदार किंवा अजाणत्या व्यक्तींकडून उद्भवणाऱ्या धोक्यांचाही समावेश होतो. भविष्यात एआय, क्वांटम गणना, ६-जी अशा भविष्यवेधी तंत्रप्रगतीमुळे डेटा प्रक्रियेची गरज व गती प्रचंड वाढणार आहे. इंटरनेट ऑफ थिंग्जपलीकडे जाऊन आता इंटरनेट ऑफ बिहेविअर्सही संकल्पना साकारली जात आहे. त्यामध्ये मानवी व्यवहारांचा अंदाज बांधणे आणि प्रसंगी त्यांना विशिष्ट वर्तनासाठी उद्युक्त करणे या दिशेने तंत्रविकासाचा विचार होत आहे. स्वाभाविकच त्यासाठी प्रत्येकाच्या वापरातील तंत्रसाधनांचे माहितीसंकलन व त्यांचा मेळ घालण्याला महत्त्व येणार आहे. माहितीसंकलन, तिचे पृथःकरण आणि त्यातून आर्थिक कमाई या स्वरूपातील व्यवसायाची वेगवेगळी प्रारूपे प्रस्थापित करून गुगल, ॲमेझॉन, फेसबुक, ॲपल, मायक्रोसॉफ्ट अशा तंत्र कंपन्यांनी अनेक देशांच्याही अर्थव्यवस्थांना मागे टाकण्याएवढे महाकाय रूप धारण केले आहे. माहितीसाठा हेच त्यांच्या महासत्ताक होण्याच्या वाटेवर पेरलेले बीज ठरले, हे स्वाभाविक आहे. त्यामुळे, डिजिटल भविष्य साकारण्यात कोणते देश यशस्वी ठरतात, याएवढेच कोणत्या कंपन्या त्याचे सर्वाधिक लाभ उठवतात, ही बाबही महत्त्वाची ठरणार आहे. भारतासाठी हे डिजिटल परिवर्तन जेवढे आव्हानात्मक तेवढेच संधींची दारेही खुली करणारे ठरणार आहे. या परिवर्तनाच्या दृष्टीने आपण जगात आघाडी घेणारी काही पावलेही उचलली आहेत. आधार ओळखपत्रे किंवा युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (यूपीआय) व्यवस्था ही त्याचीच उदाहरणे. जगातील सर्वाधिक लोकसंख्या व सर्वांत मोठी बाजारपेठ असणारा देश म्हणून आपण जगातील २० टक्के डेटाची उलाढाल करतो. परंतु फक्त तीन टक्के डेटा आपल्या देशातच साठवण्याची व्यवस्था करतो. ही साठवणूक क्षमता येत्या पाच वर्षांत चार पटींनी वाढवण्याचे नियोजन आहे, मात्र त्यासोबतच, माहितीसाठा गोपनीयतेसंबंधीच्या गरज व अधिकारांची पुरेशी जाणीव नसणे, छोट्या व मध्यम उद्योग-व्यवसाय संस्थांकडे डेटा सुरक्षिततेसाठीची ठोस व्यवस्था नसणे, डेटा साठवणे व त्याचे व्यवस्थापन यांसाठी परदेशी तंत्रसंस्थांवरील अतिअवलंबित्व अशा काही त्रुटीही दूर होणे गरजेचे आहे.






The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# भाजपची थेट २४० वरुन २८७ वर मुसंडी, काँग्रेसला धक्का; सर्व्हेतून आकडे समोर

**नवी दिल्ली :** देशात आज लोकसभा निवडणूक झाल्यास सत्ताधारी भारतीय जनता पक्षाला स्पष्ट बहुमत मिळण्याचा अंदाज आहे. भाजप स्वबळावर बहुमताचा आकडा गाठण्याचा अंदाज इंडिया टुडे-सी व्होटरनं केलेल्या सर्व्हेतून व्यक्त करण्यात आला आहे. आताच्या घडीला निवडणूक झाल्यास भाजप प्रणित एनडीए साडे तीनशे जागांच्या पुढे जाईल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.



२०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपला मोठा धक्का बसला होता. २०१४ आणि २०१९ मध्ये स्पष्ट बहुमत मिळवणाऱ्या भाजपला २०१४ मध्ये बहुमताचा आकडा गाठता आला नाही. बहुमतापासून भाजप ३२ जागा मागे राहिला. २०१९ मध्ये ३०३ जागा जिंकणाऱ्या भाजपला २४० जागांवर समाधान मानावं लागलं. त्यामुळे मित्रपक्षांच्या साथीनं भाजपला सत्ता स्थापन करावी लागली. पण आता निवडणूक झाल्यास भाजपच्या जागा वाढतील, असा इंडिया टुडे-सी व्होटरचा सर्व्हे सांगतो.सध्याच्या परिस्थितीत निवडणूक झाल्यास एनडीएला ४७ टक्के, इंडिया आघाडीला ३९ टक्के मतं मिळण्याचा अंदाज आहे. तर अन्य पक्षांना १४ टक्के मतं मिळू शकतात. हे सर्वेक्षण ८ डिसेंबर २०२५ ते २१ जानेवारी २०२६ या कालावधीत करण्यात आलं आहे. या सर्व्हेमध्ये ३६ हजार २६५ जणांचा सहभाग होता.लोकसभेची निवडणूक आता झाल्यास एनडीएला ३५२ जागा, तर इंडिया आघाडीला १८२ जागा मिळू शकतात. २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत एनडीएला २९३ जागा मिळाल्या होत्या. तर इंडिया आघाडीनं २३४ जागांवर यश मिळवलं होतं. त्यावेळी दोन्ही आघाड्यांमधील जागांचा फरक ५९ इतका होता. आता तो थेट १७० जागांवर जाताना दिसत आहे. २०२४ मध्ये झालेल्या निवडणुकीत एनडीएला ४३ टक्के मतदान झालं होतं. इंडिया आघाडीला ४० टक्के मतं मिळाली होती. आता निवडणूक झाल्यास एनडीएला ४७ टक्के मतं मिळू शकतात. तर इंडिया आघाडीला ३९ टक्के मतं मिळण्याचा अंदाज आहे. एनडीएची मतं ४ टक्क्यांनी वाढण्याचा अंदाज आहे. याआधारे त्यांच्या ५९ जागा वाढू शकतात. तर १ टक्का मतदान घटल्यानं इंडिया आघाडीच्या जागा ५२ जागा कमी होण्याचा अंदाज आहे. भाजपला २८७ जागा मिळण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. काँग्रेसला ८०, तर अन्य पक्षांना १७६ जागा मिळण्याची शक्यता आहे. २०२४ मध्ये भाजपला २४०, तर काँग्रेसला ९९ जागा मिळाल्या होत्या. २०२४ मध्ये झालेल्या निवडणुकीतील निकाल पाहता भाजपच्या ४७ जागा वाढताना आणि काँग्रेसच्या १९ जागा कमी होताना दिसत आहेत.

## मुंबई महापौर निवड फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात?

**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणूक झाल्यानंतरही महापौरपदासह विविध समिती अध्यक्षपदांचा तिढा सुटलेला नाही. त्यामुळे गट नोंदणीही होऊ शकलेली नाही. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाल्याने तीन दिवस पाळण्यात आलेला दुखवटा आणि काही नगरसेवकांनी ९ आणि १० फेब्रुवारीला आंगणेवाडी जत्रेमुळे नंतरच महापौर निवडणूक घेण्याची केलेली मागणी यामुळे महापौर निवडणूक १० फेब्रुवारीनंतरच होण्याची शक्यता आहेमुंबई महापालिका निवडणुकीनंतर महापौर कोणाचा होणार याकडे लक्ष आहे. महायुतीकडून यावर शिक्कामोर्तब झालेले नाही. त्यातच भाजप आणि शिवसेनेमध्ये स्थायी, सुधार, शिक्षण, बेस्ट यासह अन्य समित्यांचे अध्यक्षपद मिळवण्यासाठी चढाओढ आहे. यावर अंतिम निर्णय झालेला नसतानाच एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने स्वतंत्ररित्या गट नोंदणी करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, हा निर्णय मागे पडला आणि भाजप-



शिवसेनेने एकत्र गट नोंदणी करण्याचा निर्णय घेतला. अद्याप तरी ही गट नोंदणी झालेली नाही.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्य सरकारने तीन दिवस, शुक्रवारपर्यंत दुखवटा जाहीर केला आहे. तोपर्यंत एकत्रित गट नोंदणी व अन्य प्रक्रियेबाबत काही निर्णय होणार नाही. शनिवारी-रविवारी कोकण भवन बंद असल्याने गट नोंदणी करण्याची प्रक्रिया आता पुढील आठवड्यातच होण्याची शक्यता आहे.गट नोंदणीनंतर महापौर निवडणुकीसाठी सूचना काढली जाते. यामध्ये सात दिवस दिले जातात आणि त्यात नामनिर्देशन अर्ज स्वीकारले जातात.

## राष्ट्रवादीने आणखी एक शिलेदार गमावला

**पुणे :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाच्या धक्क्यातून पवार कुटुंबासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील नेते मंडळी, कार्यकर्ते अद्याप सावरलेले नाही. अशातच पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या आणखी एका शिलेदाराचं निधन झाल्याचं धक्कादायक वृत्त आलेलं आहे. पुणे शहराचे माजी महापौर आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शांतीलाल सुरतवाला यांचे आज, शुक्रवारी पहाटेच्या सुमारास दुःखद निधन झाले.शांतीलाल सुरतवाला यांनी वयाच्या ७६ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही काळापासून ते कॅन्सर या गंभीर आजाराशी झुंज देत होते. पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक येथे उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.शांतीलाल सुरतवाला यांनी १९९२ ते १९९३ या कालावधीत पुण्याचे महापौरपद भूषवले आहे. शांतीलाल सुरतवाला हे ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे अत्यंत विश्वासू सहकारी मानले जात होते. काँग्रेस मध्ये असताना पुण्यातील शरद पवार गटाचे नेतृत्व त्यांनी केले. मान कापली तरी पवार साहेबांना सोडणार नाही, असं ते म्हणायचे.

## भरसभेत अजित दादांना 'I Love You' म्हणणारा कार्यकर्ता ढसाढसा

**बारामती :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार गेल्याने त्यांच्या प्रत्येक चाहत्याच्या आणि कार्यकर्त्याचे डोळे अश्रुंनी भरलेले आहेत. दादा आज आपल्यात नाहीत यावर विश्वास तरी कसा ठेवायचा हेच त्यांना कळत नाहीये. दादांसोबत काम केलेल्या, त्यांचा सहवास अनुभवलेल्या प्रत्येकाच्या मनात त्यांच्या जाण्याने एक कीधीही न भरुन निघणारी पोकळी निर्माण झाली आहे.महापालिकेच्या निवडणूक प्रचारावेळी पिंपरी-चिंचवड येथे अजित पवारांची एक सभा सुरु होती. यादरम्यान अजित दादा भाषण करत असताना अचानक एक कार्यकर्ताय गर्दीतून ओरडला, 'अजित दादा ख डेंीश र्धो', ते एकूण अजित पवारांना हसू आवरले नाही. ते कार्यकर्त्याला मिश्किलपणे म्हणाले, घडाळ्याचं बटण दाब, ते लव्ह यू राहूदे बाजूला, घरी जाऊन बायकोला म्हण लव्ह यू, बायको म्हणेल आज लयच बिघडलाय गडी. अजित दादांचं हे उत्तर ऐकून संपूर्ण सभेत एकच हशा पिकला. ज्या अजित



दादांना आपण लव्ह यू म्हणाले, आज त्यांना अखेरचा निरोप द्याला लागतोय, या भावनेने त्या कार्यकर्त्याचा कंठ दाटून आला. दादांबाबतचा तो किस्सा सांगताना हा कार्यकर्ता ढसाढसा रडू लागला. कार्यकर्त्याने आपल्या भावनांना वाट मोकळी करुन देत सांगितलं की, मी दादा जवळ गेलो आणि दादांना म्हणालो, की दादा आय लव्ह यू. मला लव्ह यू म्हणण्यापेक्षा आपल्या बायको म्हण. ती आयुष्यभर तुझ्यासोबत खुश राहिल. मग मी माझ्या पत्नीला मेसेज पाठवला. माझ्या पत्नीनेही त्यावर सेम टू यू असा मेसेज पाठवला. नंतर तिने विचारलं, आज सूर्य कुणीकडून उगवला.

# भाजपकडे बहुमत, तरी महापौरपद निवडणुकीत बंडखोरीची भीती, महिला आरक्षणामुळे धास्ती; वरिष्ठांनी फोनवर काय सांगितलं?

**मिरा-भाईंदर :** मिरा-भाईंदर महापालिकेतील भाजपच्या नवनिर्वाचित नगरसेवकांना पूर्वपरवानगीशिवाय महापौर-उपमहापौर उमेदवारांच्या अर्जावर स्वाक्षऱ्या न करण्याचे निर्देश दिले जात असल्याचे समजते. महापौर-उपमहापौरपदासाठी पुढील आठवड्यात निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. तर, शुक्रवारी नामांकन अर्ज दाखल केले जाणार आहेत. यावेळी परस्पर बंडखोरी करत नगरसेवकांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यास भाजपची डोकेदुखी वाढू शकते. या भीतीपोटी ही खबरदारी घेतली जात असल्याचे समजते.मिरा-भाईंदर महापालिकेच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या आहेत. यात भाजपने बहुमताचा ४८चा आकडा ओलांडला असून सर्वाधिक ७८ नगरसेवक निवडून आले आहेत. त्यामुळे निश्चितच भाजपचा महापौर होणार आहे. आरक्षण सोडतीत महापौरपद हे सर्वसाधारण महिला गटासाठी आरक्षित झाले आहे. त्यासाठी येत्या ३ फेब्रुवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. तर, आज, शुक्रवारी उमेदवारांना नामांकन अर्ज दाखल करता येणार आहे.महापौरपदासाठी अनेक महिला नगरसेवक इच्छुक आहेत. यासह महापौरपद महिलांसाठी राखीव झाल्याने उपमहापौरपदासाठीच्या दावेदारांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. यावेळी आपल्याला उमेदवारी न मिळाल्याने नाराज होऊन बंडखोरी करत काही नगरसेवकांकडून दोन्ही पदांसाठी अर्ज दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.तसे झाल्यास नंतर बंडखोर उमेदवाराला नामांकन अर्ज मागे घेण्याकरिता समजूत काढण्यासाठी मोठी कसरत भाजपला करावी लागू शकते. त्यात यश न आल्यास निवडणुकीत मतविभागणी होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. यासह भाजप नगरसेवकांमध्ये महापौर-उपमहापौर निवडीवरून नाराजी असल्याचा संदेश संपूर्ण शहरात जाऊ शकतो.भीतीपोटी मागील दोन दिवसांपासून भाजपच्या नगरसेवकांना वरिष्ठांकडून फोन जात असल्याचे विश्वसनीय सूत्रांकडून कळते. यावेळी कोणीही नगरसेवक महापौर-उपमहापौर अर्जावर अनुमोदक आणि सूचक म्हणून स्वाक्षरी घेण्यासाठी आल्यास ती पूर्वपरवानगीशिवाय न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यंदा बहुतांश नगरसेवक पहिल्यांदा निवडून आले आहेत. त्यामुळे त्यांना महापौर-उपमहापौर निवडणुकीची माहिती नसल्याने जुन्यांसह प्रामुख्याने नव्या नगरसेवकांना हे निर्देश दिले जात आहेत.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पत्नीला संपर्क होत नसल्याने प्रमोद माहेरी गेले अन पायाखालची जमीन सरकली, अलिबाग हादरलं

**रायगड :** दागिन्यांच्या हव्यासापोटी एकटी राहत असलेल्या वृद्ध महिलेचा निर्घृण खून झाल्याची धक्कादायक घटना चौल ग्रामपंचायत हद्दीतील टेकाळकर आळी येथे उघडकीस आली आहे. या घटनेने संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. मंदा प्रमोद म्हात्रे (वय ७०) असे मृत महिलेचे नाव आहे. चोरीच्या उद्देशाने घरात घुसलेल्या अज्ञात चोरट्यांनी दागिने हिसकावण्याच्या प्रयत्नात झालेल्या झटापटीत त्यांचा जीव घेतल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे. ही घटना रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे.मंदा या गेल्या दहा वर्षांपासून टेकाळकर आळी येथील आपल्या माहेरच्या मालमत्तेची देखरेख करण्यासाठी त्या घरात एकट्याच राहत होत्या. त्यांचे पती प्रमोद शांताराम म्हात्रे हे अलिबाग तालुक्यातील गुंजीस येथे वास्तव्यास आहेत. २८




जानेवारी रोजी सकाळी साडेनऊ वाजेपर्यंत पती-पत्नींमध्ये फोनवर संपर्क झाला होता. मात्र, सकाळी साडेदहा वाजल्यानंतर मंदा यांचा फोन लागत नसल्याने पती प्रमोद म्हात्रे यांना संशय आला.दिवसभर संपर्क न झाल्याने रात्री सुमारे आठ वाजण्याच्या सुमारास ते टेकाळकर आळी येथील घरी आले. घराच्या पाठीमागील दरवाजा उघडा असल्याचे दिसताच त्यांना अनर्थाची शंका आली. घरात प्रवेश केल्यानंतर मंदा या किचनमध्ये बेशुद्ध अवस्थेत पडलेल्या आढळून आल्या. तातडीने तपासणी केली असता त्यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. घटनेची माहिती मिळताच रेवदंडा पोलीस ठाण्याचे अधिकारी, श्वान पथक आणि फॉरेन्सिक पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांच्या प्राथमिक पाहणीत मृत महिलेच्या डाव्या कानाखाली जखम आढळून आली आहे. तर मानेच्या उजव्या बाजूला दोन वळ (खुणा) स्पष्टपणे दिसून आल्या आहेत. त्यांच्या कानातील सोन्याच्या रिंगा आणि गळ्यातील सोन्याची माळ जबरदस्तीने काढून नेण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे दागिने लुटताना झालेल्या झटापटीतच त्यांचा मृत्यू झाल्याचा ठोस संशय पोलिसांनी व्यक्त केला आहेया प्रकरणी फिर्यादी प्रमोद शांताराम म्हात्रे यांच्या तक्रारीवरून रेवदंडा पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा गु.रजि. नं. १२/२०२६ अन्वये भा.न्या.सं. २०२३ चे कलम १०३ (१), ३११ व ३३१ (७) अंतर्गत नोंदविण्यात आला असून, अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक बी. के. जाधव करीत आहेत.

उपविभागीय पोलीस अधिकारी माया मोरे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तसेच पोलीस उपनिरीक्षक भैरू किसन जाधव, दीपक म्हशीळकर, मनीष ठाकूर, सिद्धेश म्हात्रे, कुंभार, सुग्रीव गव्हाणे आणि सुधीर पाटील यांनी तपासाला गती दिली आहे. एकटी वृद्ध महिला हेरून घरात घुसून तिचा खून करण्यात आल्याने परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. आरोपींचा तातडीने शोध घ्यावा अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## चालत्या बाईकवरुन खाली ओढलं; जीम ट्रेनरला रस्त्यातच संपवलं

**कोल्हापूर :** सांगली-कोल्हापूर महामर्गावरील जांभळी-जयसिंगपूर रस्त्यावर कुरडे मळ्याजवळ काल बुधवारी रात्री एक भयानक घटना घडली आहे. एका जिम ट्रेनरवर हल्ला करुन त्याचा खून करण्यात आला आहे. हल्लेखोर खुनानंतर पसार झाले असून पोलिसांकडून त्यांचा शोध घेतला जात आहे. मात्र, या धक्कादायक घटनेमुळे शिरोळ परिसरात खळबळ उडाली आहे. काल बुधवारी रात्री साडेनऊच्या सुमारास जिम ट्रेनर संदीप भाऊसाहेब पाटील (वय ४४, रा. माळभाग, जांभळी) यांचा लोखंडी हत्यारानं वर्मी हल्ला करून खून करण्यात आला आहे. हल्लेखोरांची चारचाकी वाहन चारीत अडकल्याने त्यांनी गाडी आणि मोबाईल घटनास्थळी सोडून पसार होण्यात यश मिळवले. हा खून वैयक्तिक वैमनस्य किंवा गुन्हेगारी विश्वाशी निगडित आहे का? याची शक्यता पोलीस तपासत असून, खूनामागील कारणाचा उलगडा अद्याप झाला नाही आहे. शिरोळ पोलिसांत या घटनेची नोंद झाली असून जयसिंगपूर डीवायएसपी अमोल राठोड




यांच्या नेतृत्वाखाली तपास तीव्र केला असून, हल्लेखोरांना लवकरच पकडलं जाईल, अशी पोलिसांची भूमिका आहे. संदीप पाटील हे जांभळी येथील जिमम धून काम संपवून आपल्या मोपेडवरून जयसिंगपूरच्या दिशेने रवाना झाले होते. कुरडे मळ्याजवळ पोहोचताच दबा धरून बसलेल्या हल्लेखोरांनी त्यांच्या डोक्यात लोखंडी रॉडने भयानक वार केले. या हल्ल्यात संदीप यांचा जागीच मृत्यू झाला. हल्ल्यानंतर पळ काढण्याच्या घाईत हल्लेखोरांची चारचाकी गाडी रस्त्याच्या कडेला असलेल्या चारीत अडकली. गाडी बाहेर काढणे अशक्य झाल्याने त्यांनी ती गाडी तसेच त्यांचा मोबाईल घटनास्थळीच सोडला.

## तापीत केंद्र प्रमुखाची बॉडी, लेकीची माहिती

**नंदुरबार :** नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील प्रकाशा केंद्रातील केंद्रप्रमखाचा मृतदेह प्रकाशातील तापी नदी पात्रात काल प्रजासत्ताकदिनाच्या दिवशीच आढळल्यानं शहरात एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी मयत केंद्रप्रमुख यांच्या मुलीच्या सांगण्यावरुन पाण्यात बुडून मृत्यू चालण्याची नोंद करण्यात आली असून आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.शहादा येथील रहिवाशी किशोर विठ्ठल महाले (वय ४४) हे शहादा तालुक्यातील प्रकाशा केंद्रात केंद्रप्रमुख म्हणून कार्यरत होते. त्यांचा मृतदेह प्रकाशा येथील जुन्या पुलाजवळ असलेल्या तापी नदी पात्रात मध्यभागी काल रोजी दुपारी ११ वाजेच्या सुमारास आढळला. त्यांचा मृतदेह बाहेर काढल्यानंतर प्रकाशातील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आला. त्याठिकाणी डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं. दरम्यान, त्यांची दुचाकी जुन्या पुलावर आढळून आली. किशोर महाले हे मनमिळावू स्वभावाचे होते. घटनेची माहिती मिळताच नातेवाईकांनी गर्दी केली. मयताची मुलगी लोकेश्वरी किशोर महाले यांनी शहादा ठाण्यात याची माहिती दिली.

## महिलालेला बोलण्यात गुंतवलं, मंगळसूत्र हिसकावून चोरटा पसार

**भोपाळ :** भोपाळ येथील एम्स रुग्णालयात एका महिला कर्मचाऱ्याला लिफ्टमध्येच लुटण्यात आल्याची धक्कादायक घटना सोमवारी उघडकीस आली. मास्क लावलेल्या चोरट्याने लिफ्टमध्ये शिरुन महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावली आणि पळ काढला. या प्रकाराचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले असून रुग्णालयाच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.वारंवार होणाऱ्या किरकोळ चोऱ्या भोपाळ एम्स परिसरात आधीही नोंदवल्या गेल्या आहेत, परंतु रुग्णालयाच्या लिफ्टमध्ये महिलेला लक्ष्य करून चेन हिसकावून नेण्याची ही पहिलीच घटना आहे.ही घटना रविवारी घडल्याची माहिती आहे. स्त्रीरोग विभागात कार्यरत असलेली महिला कर्मचारी वर्षा सोनी रक्तपेढीमागील लिफ्टमध्ये एकटी होती. त्यावेळी मास्क घातलेला एक तरुण लिफ्टमध्ये शिरला आणि त्याने नेत्ररोग विभाग कोणत्या मजल्यावर आहे असे विचारले.लिफ्ट तिसऱ्या मजल्यावर पोहोचताच तो तरुण बाहेर आला आणि



परत वळून वर्षा सोनींवर झेपावला. त्याने त्यांच्या गळ्यातील सोने आणि मोत्यांची माळ, तसेच मंगळसूत्र हिसकावण्याचा प्रयत्न केला. वर्षा यांनी प्रतिकार केला, पण त्याने जोरात बाजूला ढकलले. आरोपी मंगळसूत्र हिसकावून जिन्याकडे पळून गेला, तर मोत्यांची माळ तुटून खाली पडली.लिफ्ट परिसरात एकही सुरक्षा रक्षक उपस्थित नव्हता. घटनेनंतर वर्षा सोनी लिफ्टजवळ एकटीच रडत बसली होती. नियमित फेरफटका मरणाऱ्या एका सुरक्षा रक्षकाने तिला पाहिले आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली. बघशेवानिया पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे, परंतु अद्याप एफआयआर नोंदवण्यात आलेली नाही.

# बापाचे अश्रू खाकीने पुसले! मुलीच्या शिक्षणाचे चोरीला गेलेले ५ लाख रुपये पोलिसांनी कर्नाटकातून शोधून आणले, काय घडलेलं?

**बुलढाणा :** 'लेक शिकून डॉक्टर व्हावी' हे स्वप्न उराशी बाळगून एका बापाने मोठ्या कष्टाने ५ लाख रुपये जमवले होते. पण, बुलढाण्यात भरदिवसा या रकमेवर चोरट्यांनी डल्ला मारला आणि त्या वडिलांच्या पायाखालची जमीनच सरकली. मात्र, बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेने फिल्मी स्टाईलने तपास करत थेट कर्नाटक गाठले आणि चोरट्यांच्या मुसक्या आवळून चोरी गेलेली संपूर्ण रक्कम जप्त केली. पोलिसांनी केवळ पैसेच परत आणले नाहीत, तर त्या मुलीच्या तुटणाऱ्या स्वप्नांना पुन्हा उभारी दिली आहे.९ सप्टेंबर २०२५ रोजी ही थरारक घटना घडली होती. मेहेकर येथील रहिवासी असलेले हे वडील आपल्या मुलीच्या वैद्यकीय शिक्षणाची फी भरण्यासाठी ५ लाख रुपये घेऊन बुलढाण्यात आले होते. चोरट्यांनी मेहेकरपासूनच त्यांच्यावर पाळत ठेवली होतीबुलढाण्यातील राजश्री शाहू विद्यालयासमोर त्यांनी आपली कार उभी केली आणि काही कामानिमित्त बाहेर गेले.

नेमकी हीच संधी साधून पाठलाग करत आलेल्या दोन चोरट्यांनी कारची काच फोडली आणि पैशांची बॅग घेऊन फरार झाले.मुलीच्या शिक्षणाचे पैसे गेल्याने हताश झालेल्या पित्याने पोलीस ठाणे गाठले. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून जिल्हा पोलीस अधीक्षक नीलेश तांबे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला (डउइ) तपासाचे आदेश दिले. तांत्रिक विश्लेषण, शेकडो सीसीटीव्ही फुटेजची तपासणी आणि खबऱ्यांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांना समजले की, आरोपी थेट कर्नाटक राज्यात पळून गेले आहेत.स्थानिक गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने तातडीने कर्नाटक गाठले आणि मोठ्या शिताफीने दोन आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून चोरीस गेलेले संपूर्ण ५ लाख रुपये हस्तगत करण्यात आले आहेत. आपली चोरी झालेली रक्कम पुन्हा सुखरूप पाहून संबंधित वडिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. बुलढाणा पोलिसांच्या या तत्परतेमुळे एका मुलीचे डॉक्टर होण्याचे स्वप्न पुन्हा जिवंत झाले असून, संपूर्ण जिल्ह्यात पोलिसांचे कौतुक होत आहे.



# पाकिस्तानच्या पायाखालची जमिनच सरकली, आता वर्ल्ड कपवर बहिष्कार का टाकणार नाही

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** बांगलादेशनेनंतर आता पाकिस्तान आयसीसीला वर्ल्ड कपवर बहिष्का टाकण्याची धमकी देत आहे. पण आयसीसीने पाकिस्तानच्या मुसक्या चांगल्या आवळल्या आहेत. आयसीसीने पाकिस्तानला फक्त एकच गोष्ट सांगितली आणि त्यांच्या पायाखालची जमिन आता सरकली आहे. आयसीसीच्या या निर्णयाची जगभरात चर्चा होत आहे. आयसीसी आणि बीसीसीआयला आपली ताकद दाखवण्यासाठी भारताविरुद्धच्या सामन्यावर बहिष्कार टाकण्याचा पर्याय पाकिस्तान बोर्डाकडून तपासून पाहिला जात आहे. वर्ल्ड कप स्पर्धेत सर्वाधिक प्रतिसाद भारत-पाक सामन्याला असतो. त्या सामन्याच्या प्रक्षेपणातून मिळणारे उत्पन्नामुळे प्रक्षेपणाचा मोठ्या प्रमाणावर





करार होत असतो. या परिस्थितीत आयसीसीला थेट हादरवण्यासाठी हा पर्याय तपासून बघितला जात आहे, असे सूत्रांनी सांगितले. मात्र, आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी हायब्रिड मॉडेल मान्य करताना पाकने भारताविरुद्धचे सामने खेळण्याचे मान्य केले होते. हा करार मोडल्याबद्दल पाककडून मोठ्या प्रमाणावर नुकसान भरपाईची मागणी आयसीसी करू शकेल, असेही सांगितले जात आहे. वर्ल्ड कप टी-२० क्रिकेट स्पर्धेतील आपल्या लढती भारतात खेळण्याची बांगलादेशची मागणी आयसीसीने फेटाळली. त्याच्या निषेधार्थ पाकने वर्ल्ड कप स्पर्धेवर बहिष्कार टाकण्याची भाषा सुरू केली होती. पण जर आयसीसीला त्यांना नुकसान भरपाई द्यावी लागेल, हे समजताच त्यांच्या पायाखालची जमिनच सरकली आहे. कारण ही रक्कम करोडो नाही तर अब्जांवमध्ये असणार आहेऑपरेशन सिंदूर'च्या वेळी भारतविरोधात आक्रमक भूमिका घेतलेले मोहसीन नक्वी हे पाकिस्तानचे अंतर्गत सुरक्षामंत्री आहेत. तेच पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे; तसेच आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष आहेत. त्यांनी सोमवारी पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाझ शरीफ यांची भेट घेतली. त्यानंतर 'पाकच्या वर्ल्ड कप सहभागाबाबतचा अंतिम निर्णय शुक्रवारी अथवा पुढील सोमवारी होईल,' असे पाकिस्तान पंतप्रधान कार्यालयाच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.टी-२० क्रिकेट वर्ल्ड कप आणि बांगलादेश क्रिकेट बोर्डाने घेतलेल्या निर्णयाबाबत नक्वी यांनी पंतप्रधानांना माहिती दिली. पंतप्रधानांनी सर्व पर्याय खुले ठेवून हा प्रश्न सोडवण्यास सांगितले आहे. त्याच वेळी अंतिम निर्णय शुक्रवारी अथवा पुढील सोमवारी घेण्याचे ठरले, असे पत्रकात म्हटले आहे. ही चर्चा खूपच फलदायी झाल्याचे नक्वी यांनी सांगितले.

## बांगलादेशची अक्कल अखेर ठिकाणावर आली, आयसीसीपुढे गुडघे टेकले

**नवी दिल्ली :** बांगलादेशने आता आयसीसीकडे अखेरची मागणी केली आहे.बांगलादेशने भारताला कसा मोठा धक्का येईल, याचा विचार केला आणि भारतामध्ये टी २० वर्ल्ड कपचा एकही सामना खेळणार नसल्याचे त्यांनी आयसीसीला सांगितले. आयसीसीचे म्हणणे स्पष्ट होते की, वर्ल्ड कपच्या सर्व सामन्यांचे आयोजन झाले आहे, त्यामुळे आता सामन्यांचे ठिकाण बदलता येणार नाही. बांगलादेशच्या क्रिकेट मंडळाला समजू चुकले की, आपली डाळ काही आयसीसीपुढे शिजणार नाही. त्यामध्ये पाकिस्तानने या आगीत तेल टाकले. बांगलादेशच्या सरकारला यामध्ये हस्तक्षेप करावा लागला. पाकिस्तानचा पाठिंबा असल्याचे समजल्यावर बांगलादेशने वर्ल्ड कपवर थेट बहिष्कार टाकण्याचा मोठा निर्णय घेतला. पाकिस्तानही वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकेल, असे बांगलादेशला वाटत होते. पण त्यानंतर पाकिस्तानने पलटी मारली आणि अजूनही ते बहिष्कार करू शकले नाहीत. बांगलादेश त्यानंतरही शातं बसली नाही, त्यांनी आयसीसीला



सांगितले की, या प्रकरणी आम्हाला न्याय हवा आहे, त्यासाठी एक स्वतंत्र समितीची स्थापना करा आणि आम्हाला न्याय मिळवून द्या. बांगलादेशने चूक केल्यावरही न्यायाची अपेक्षा करत होता.बांगलादेशला आता आपली चूक समजली आहे. आपण पाकिस्तानवर विश्वास ठेवण्यापेक्षा आयसीसीवर ठेवायला हवा होता. त्यामुळे आता बांगलादेशने नमते घेतले आहे. आयसीसीपुढे त्यांनी आता गुडघे टेकले आहेत आणि त्यांच्याकडे अखेरची मागणी केली आहे. बांगलादेशच्या क्रिकेट मंडळाने आयसीसीला सांगितले आहे की, आयसीसीने आता आमच्यासाठी स्वतंत्र समितीची स्थापना करू नये आणि या प्रकरणामधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे.


## बांगलादेशला आता अजून एक मोठा धक्का

**नवी दिल्ली :** बांगलादेशचे तारे आता चांगलेच फिरलेले आहेत. कारण आता आयसीसीने बांगलादेशला अजून एक मोठा धक्का दिला आहे. आता आयसीसीने असा निर्णय घेतला आहे की, बांगलादेशला तोंड दाबून बुक्क्यांचा मार खावा लागणार आहे.बांगलादेश शहाणपणा करायला गेली आणि आपल्या पायावर त्यांनी धोंडा मारून घेतला. आयसीसीने बांगलादेशच्या जागी आयर्लंडला वर्ल्ड कपमध्ये संधी दिली आहे. त्यामुळे आता वर्ल्ड कप फक्त काही जादू झाली तरच खेळता येऊ शकतो. बांगलादेशला भारत असुरक्षित वाटतो, तर त्यांचे चाहते आणि पत्रकार भारतामध्ये कसे येऊ शकतात, असा खडा सवाल आयसीसीने विचारला. त्यानंतर आयसीसीने एक मोठा निर्णय घेतला. बांगलादेशमधून जवळपास १०० पत्रकारांनी वर्ल्ड कपच्या वार्तांकनासाठी अर्ज केला होता. त्याचबरोबर शेकडो चाहत्यांनी वर्ल्ड कप पाहण्यासाठी व्हिसा मागितला होता. पण आयसीसीने या सर्वांचे व्हिसा नाकारले आहेत. यावर आता बांगलादेशही इच्छा असून काही करू शकत नाही.

## टीम इंडियाचा स्टार खेळाडू विराट कोहलीचे इंस्टाग्राम अकाउंट सुरू

**मुंबई :** टीम इंडियाचा स्टार खेळाडू विराट कोहलीचे इंस्टाग्राम अकाउंट अचानक गायब झाले होते. ३० जानेवारीच्या सकाळपासून २७० दशलक्षाहून अधिक फॉलोअर्स असलेले हे व्हेरिफाईड अकाउंट सर्चमध्ये दिसत नव्हते. चाहत्यांना इंस्टाग्रामवर 'प्रोफाइल उपलब्ध नाही' असं दिसत होतं. या अचानक गायब होण्यामागे कोणतीही अधिकृत कारण समोर आलेले नव्हतं, ना कोहलीकडून, ना त्यांच्या टीमकडून, ना इंस्टाग्रामकडून. आता पुन्हा अकाउंट सुरू झाले आहे. चाहत्यांनी अनुष्काताच्या पोस्टमध्ये जाता तिला विचारलं.

विराट कोहलीच्या भावाचे, विकास कोहलीचे इंस्टाग्राम अकाउंट देखील शुक्रवारच्या सकाळपासून सर्चमध्ये येत नव्हते. त्यांच्या प्रोफाइलला ॲक्सेस करण्याचा प्रयत्न करणाऱ्या युजर्सनाही 'प्रोफाइल उपलब्ध नाही' असाच संदेश मिळाला. विराट कोहलीचे इंस्टाग्राम अकाउंट अचानक गायब झाल्याने चाहतेकाळजीत होते. २७० दशलक्षाहून अधिक फॉलोअर्स असलेले हे व्हेरिफाईड




अकाउंट ३० जानेवारीच्या सकाळपासून सर्चमध्ये दिसत नव्हतं. या घटनेमागे नेमके काय कारण आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.विराट कोहलीच्या इंस्टाग्राम अकाउंटच्या गायब होण्यावर सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया उमटल्या. काही चाहत्यांनी चिंता व्यक्त केली, तर काहींनी आश्चर्य व्यक्त केले. अनेक चाहत्यांनी विराट कोहलीची पत्नी अनुष्का शर्माच्या इंस्टाग्राम पोस्टवर कमेंट करून विचारले, 'वहिना, दादांचं अकाउंट कुठे गेलं?' आणि याबद्दल माहिती मागितली. मात्र, विराट कोहली इतर प्लॅटफॉर्मवर सक्रिय आहे.विराट कोहलीचे इंस्टाग्राम अकाउंट हे जगातील सर्वाधिक फॉलोअर्स असलेल्या अकाउंटपैकी एक आहे. चाहते विविध तर्कवितर्क लावले होते.

## भारताला पराभवानंतर मिळाली अजून एक वाईट बातमी, सामना संपल्यावर नेमकं घडलं तरी काय ?

**विशाखापट्टणम/वृत्तसंस्था :** भारताला चौथ्या टी २० सामन्यात लाजीरवाणा पराभव पत्करावा लागला. पण या पराभवानंतर भारतासाठी अजून एक वाईट बातमी आली आहे. हा चौथा सामना संपल्या आणि त्यानंतर भारताच्या संघासाठी बॅड न्यूज आली आहे.चौथ्या सामन्यात भारताने टॉस जिंकला आणि त्याने पुन्हा एकदा न्यूझीलंडला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. पण या सामन्यात भारताचे वेगवान गोलंदाज पुरते अपयशी ठरले. कारण न्यूझीलंडच्या सलामीवीरांनी फक्त ८.२ षटकांत आपले शतक पूर्ण केले. न्यूझीलंड आता मोठी धावसंख्या रचणार, असे वाटत होते. पण त्यानंतर भारताच्या गोलंदाजांनी धावांवर अंकुश लावला. डेवॉन कॉनवे ४४ धावांवर बाद झाला खरा, पण टीम सेफर्टने यावेळी भारताविरुद्धचे सर्वात कमी चेंडूंतील अर्धशतक पूर्ण केले. सेफर्टने या सामन्यात ३६ चेंडूंत ६ चौकार आणि तीन षटकारांच्या जोरावर ६२ धावांची खेळी साकारली. हे दोघे बाद झाले आणि त्यामुळे न्यूझीलंडच्या संघाला यावेळी २१८ धावा करता आल्या. न्यूझीलंडच्या आव्हानाचा पाठलाग करताना अभिषेक शर्मा शून्यावर बाद झाला, सूर्याला ८ धावा करता आल्या, तर हार्दिक पंड्याने दोन धावांवर समाधान मानले. संजू सेट झाला तरी तो २४ धावाच करू शकला. पण रिंकू सिंगने ३९ धावा केल्या, पण त्यानंतर सामन्यात रंगत आणली ती शिवम दुबेने. कारण शिवमने या सामन्यात फक्त २३ चेंडूंत ६५ धावांची खेळी साकारली, पण त्याला भारताला सामना जिंकवून देता आला नाही. पण या पराभवानंतर भारताला अजून एक वाईट बातमी मिळाली आहे.भारताचा हा या मालिकेतील पहिला पराभव ठरला. न्यूझीलंडने भारताला या सामन्यात ५० धावांनी पराभूत केले. पण भारतावर यावेळी नामुष्कीची वेळ आली. कारण आतापर्यंतच्या भारतामधील टी २० सामन्यात टीम इंडियाचा न्यूझीलंडकडून झालेला हा मोठा पराभव ठरला आहे. यापूर्वी न्यूझीलंडला भारताला त्यांच्याच मैदानात कधीही ५० किंवा त्यापेक्षा जास्त धावांनी पराभूत करता आले नव्हते, ती गोष्ट न्यूझीलंडने या सामन्यात करून दाखवली आहे.भारताने यापूर्वी झालेल्या तिन्ही सामन्यांत विजय मिळवला होता. पण चौथ्या सामन्यात मात्र त्यांना पराभव पत्करावा लागला.



# 'कधी तुम्ही सत्तेत असता तर कधी विरोधात'



## राजकारणातील एन्ट्रीवर काय म्हणाला रितेश देशमुख?

**मुंबई :** सुप्रसिद्ध अभिनेता रितेश देशमुखचं राजकरणासोबत जवळचं नातं असून तो महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचा मुलगा आहे. रितेशचे दोन्ही भाऊ राजकारणात सक्रीय आहेत. मात्र, रितेश राजकारणात नसला तरी अनेक राजकीय मुद्द्यांवर भाष्य करतो. अशातच आता नुकत्याच एका मुलाखतीमध्ये रितेशनं राजकारणावर भाष्य केलं आहे. रितेश देशमुखनं राहुल महाजनच्या पॉडकास्टमध्ये राजकारणावर भाष्य केलं आहे. इंडस्ट्री सोडून राजकरणात प्रवेश करण्याबद्दल रितेश म्हणाला, 'लोकांचं माझ्यावर अभिनेता म्हणून प्रेम आहे. तेच प्रेम मला इतर कोणत्या क्षेत्रात मिळेल हे गरजेचं नाही. आजपर्यंत अनेक अभिनेते नंतर राजकारणात गेले आणि त्यांनी चांगलं कामही केलं. काही असेही आहेत जे निवडणूकीत उभे राहिले पण जिंकू शकले नाहीत. मला वाटतं की, राजकारणात वेगळ्या प्रकारची कमिटमेंट लागते. सध्या मी जे करतोय त्यात मी खूश आहे. जे केल्याने तुम्हाला आनंद मिळतो तेच आपण केलं पाहिजे असं मी नेहमीच सांगतो.'आपण दोघांनी लहानपणापासून राजकारण खूप जवळून बघितलं आहे. अजूनही बघत आहोत.

कधी शिकायची गरज नव्हती कारण घरातच राजकीय वातावरण असल्यानं आपोआपच आपण ते शिकत गेलो. मी राजकारणात चांगलं काहीतरी करू शकतो असा विचार तू माझ्याबद्दल करतोय त्यासाठी आभार. पण मी असा विचार करत नाही. कारण लॉजिकली या गोष्टी करणं खूप वेगळं आहे. तू जर मला विचारलंस की मला राजकारण आवडतं की नाही? तर हो, मला राजकारण खूप आवडतं. मला राजकारण समजतं. आज राजकारणात काय काय गोष्टी गरजेच्या आहेत हेही मला माहित आहे. पण राजकारण सजमणं आणि प्रत्यक्षात उतरून काम करणं यात खूप मोठं अंतर आहे. मी आज माझ्या भावांना बघतोय, ते काय करतायत. घरी जेवताना अनेक विषयांवर चर्चा होते.'प्रत्येक जण आपापल्या परीने अनेक गोष्टी करतोय. वातावरण बदलतं, कधी तुम्ही सत्तेत असता तर कधी विरोधात असता हे सुरूच राहतं. पण तुम्हाला लोकांचं प्रेम मिळालंय म्हणून तुमच्यासाठी निवडणूक खूप सोपी होते असं गरजेचं नाही. कारण लोक खूप हुशार आहेत. एका अभिनेत्याकडून तुम्हाला असलेली अपेक्षा आणि एका नेत्याकडून असलेली अपेक्षा वेगळी. काहींना ते दोन्ही जमतं हे खरोखर कौतुकास्पद आहे. पण मला ते शक्य नाही.' असं रितेशनं पुढे सांगितलं.

## इम्रान हाश्मीने बदलून दाखवली 'किसिंग किंग' ही ओळख



**मुंबई :** किसिंग किंग' अशी ओळख निर्माण झालेला अभिनेता इम्रान हाश्मी अलीकडे विविध प्रकारच्या भूमिका साकारून प्रेक्षकांची मनं जिंकत आहे. विशेषतः ओटीटीविश्वात त्यानं अनोख्या भूमिका साकारून आधीची इमेज बदलून स्वतःची नवी ओळख निर्माण केली. 'शोटाइम' आणि 'द बॅड्स ऑफ बॉलिवूड' या सीरिजमधील त्याच्या कामाचं कौतुक झालं. अलीकडे नेटफ्लिक्सवर आलेल्या 'तस्करी- द स्मगलर्स वेब' या सीरिजमध्ये त्यानं साकारलेल्या अर्जुन मीना या पात्रानं प्रेक्षकांच्या मनावर गारुड केलं.कस्टममधील अधिकारी अहोरात्र मेहनत घेत असतात, हे विस्तृतपणे दाखवणारी कलाकृतीच आली नव्हती. त्यांचे कष्ट दाखवण्याची संधी मिळाली, हे मी माझं भाग्य समजतो. त्यांच्याकडे असलेली दूरदृष्टी कमाल आहे. ती आत्मसात करण्याचा प्रयत्न केला', असं इम्रान सांगतो. 'तस्करी' हा प्रोजेक्ट स्वीकारण्यामागील कारणाविषयी इम्रान सांगतो, 'अनेक वर्षांपासून नीरज पांडे यांच्यासोबत काम करण्याची इच्छा होती. काही प्रोजेक्ट्सची बोलणी झाली, पण त्याचं पुढे काहीच झालं नाही. अखेरीस 'तस्करी' सीरिजच्या वेळी सगळं काही जुळून आलं. शिवाय, कस्टम अधिकाऱ्यांचं विश्व दाखवण्याची संधी मिळत होती, म्हणून मी हा प्रोजेक्ट स्वीकारला'.कस्टम अधिकाऱ्यांच्या युनिटमध्ये ऐक्य असणं आवश्यक असतं, तर ते गुन्हेगारांना पकडू शकतात. तसंच ऐक्य आम्हा सहकलाकारांच्या युनिटमध्ये होतं, त्यामुळे ही कलाकृती यशस्वी झाली.

## राधिका भिडेची स्वप्नपूर्ती

**मुंबई :** लोकप्रिय गायिका राधिका भिडेनं ओटीटी प्लॅटफॉर्मवरील 'आय पॉपस्टार' या कार्यक्रमात गायलेल्या मराठी गाण्यानं प्रसिद्धी मिळवली. राधिकाचं 'मन धावतंया' हे गाणं ऐकताच आय पॉपस्टारच्या हिंदी परीक्षकांनाही भुरळ पडली. राधिकाला या गाण्यानं वेगळी ओळख मिळाली आणि ती प्रसिद्धीझोतात आली. अशातच आता राधिका एका मालिकेमध्ये दिसणार आहे. सावळ्याची जणू सावली ' मालिकेमध्ये नवा ट्विस्ट आला आहे. मालिकेमध्ये सावलीच्या आवाजाचं सत्य सर्वांना समजलं असून मेहंदळे कुटुंब आता सावलीच्या पाठीशी खंबीरपणे उभं राहिलं आहे. अशातच आता सावली मालिकेमध्ये गायिका राधिका भिडेसोबत गाणं गाताना दिसणार आहे.'झी मराठी'नं शेअर केलेल्या 'सावळ्याची जणू सावली' मालिकेच्या प्रोमोमध्ये सावली तिचं पहिलं गाणं रेकॉर्ड करताना दिसणार आहे. रेकॉर्डिंग रूममध्ये सावली, तिलोत्तमा आणि सारंग असतात.



## पाच अभिनेत्यांसोबत अफेअरच्या चर्चा

### ब्रेकअपमुळे सिनेमा सोडला, १० वर्षांनी मोठ्या २ मुलांच्या बापासोबत थाटला संसार अन..

**मुंबई :** एकेकाळी इंडस्ट्रीवर राज्य करणारी ही अभिनेत्री आता ४५ वर्षांची आहे. ती दोन मुलांची आई असूनही ती अजूनही तिच्या सौंदर्य आणि फॅशन सेन्समध्ये अनेक तरुण अभिनेत्रींना मागे टाकते. या अभिनेत्रीचं नाव पाच अभिनेत्यांसोबत जोडलं गेलेलं. तिनं २००० मध्ये बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं.या अभिनेत्रीचं नाव तिच्या पहिल्या चित्रपटातील सह-कलाकार अभिषेक बच्चनशी जोडलं गेलं होतं. ही अभिनेत्री दुसरी-तिसरी कुणीही नसून करिना कपूर आहे. करिनाचं नाव तिच्या पहिल्या चित्रपटातील सह-कलाकार अभिषेक बच्चनसोबत जोडलं गेलं होतं. अभिषेकचं करिनाच्या कुटुंबाशी खरं नातं तिची बहीण करिश्मा कपूरमुळे होतं. 'मुझसे दोस्ती करोगी', 'मैं प्रेम की दिवानी हूं', 'कभी खुशी कभी गम' आणि इतर चित्रपटांमधील करिना आणि हृतिक यांच्या ऑनस्क्रीन केमिस्ट्रीमुळे २००० च्या दशकाच्या सुरुवातीला त्यांच्या अफेअरच्या अफवा पसरल्या होत्या. दोघांनीही या चर्चा खोट्या असल्याचं सांगितलं. करिनाने स्पष्टपणे सांगितलं की, तिला कधीही दुसऱ्या महिलेचा नवरा नको होता, कारण त्यावेळी हृतिकचं आधीच सुझान खानशी लग्न झालं होतं. नंतर करिना कपूरचं नाव तुषार कपूरशी जोडलं गेलं. त्यांनी त्यांच्या कारकिर्दीच्या सुरुवातीला 'मुझे कुछ कहना है' आणि 'जीना सिर्फ मेरे लिए' मध्ये एकत्र काम केलं. पण, तुषार आणि करिनाने आमच्यात मैत्री आहे, असं म्हटलं.करिना कपूरचं नाव फरदीन खानशी देखील जोडलं गेलं. २००३ मध्ये आलेल्या 'खुशी' चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान करिना आणि फरदीन यांच्यात जवळचं नातं असल्याच्या अफवा होत्या. करिना कपूरचा सर्वात चर्चेत असलेलं रिलेशनशिप शाहिद कपूरसोबत होतं. २००४ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'फिदा' चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान त्यांची भेट झाली. शाहिद आणि करिना जवळपास पाच वर्षे एकत्र होते आणि २००७ मध्ये 'जब वी मेट'च्या शूटिंगदरम्यान ते वेगळे झाले. शाहिद आणि करिनाने अनेक चित्रपटांमध्ये एकत्र काम केलं. ब्रेकअपमुळे ब्रेकअपमुळे 'माइल-माइल' हा चित्रपट मध्येच सोडला. चित्रपट रखडला होता, परंतु काही वर्षांनी चित्रपटात एकत्र काम केलं.शाहिद कपूरसोबत ब्रेकअप झाल्यानंतर करिनाने सैफ अली खानला डेट करायला सुरुवात केली. २००७ मध्ये आलेल्या 'टशन' चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान त्यांचं रिलेशनशिप सुरू झालं. पाच वर्षांच्या डेटिंगनंतर त्यांनी १६ ऑक्टोबर २०१२ रोजी लग्न केलं. त्यांना तैमूर आणि जेह ही दोन मुलं आहेत.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# कुसुम मोहिमेअंतर्गत जिल्हा कारागृहात ३१४ बंदीवानांची कुष्ठरोग तपासणी

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्य शासनाच्या कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र(कुसुम) कुष्ठरोग शोध मोहीम २०२५-२६ अंतर्गत बुलढाणा जिल्हा कारागृहात विशेष आरोग्य तपासणी व जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेत कारागृहातील एकूण ३१४ बंदीवानांची प्रत्यक्ष शारीरिक तपासणी करण्यात आली. ही मोहीम ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. बुलढाणा कारागृहात झालेल्या या तपासणी दरम्यान आरोग्य सेवा (कुष्ठरोग) विभागाच्या चमूने बंदीवानांना कुष्ठरोगाची लक्षणे, उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत सविस्तर आरोग्य शिक्षण दिले. यावेळी आरोग्य सेवा (कुष्ठरोग) सहाय्यक संचालक डॉ. हरी एस. पवार, जिल्हा कारागृहाचे कारागृह अधीक्षक मेधा बाहेकर उपस्थित होते. केंद्र सरकारने २०२७ पर्यंत कुष्ठरोगाचा प्रसार पूर्णपणे थांबवण्याचे ध्येय ठेवले आहे. याच उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी बुलढाणा जिल्ह्यातील वंचित आणि जोखमीच्या क्षेत्रांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील १८ हजार ८५१ व्यक्तींची तपासणी करण्यात येणार असून यासाठी १७० आशा स्वयंसेविका आणि पुरुष स्वयंसेवकांची टीम कार्यरत आहे. कारागृहाप्रमाणेच जिल्ह्यातील इतर संवेदनशील वस्तींमध्येही ही मोहीम राबवली जाणार आहे. कुष्ठरोगाचे वेळीच निदान झाल्यास तो पूर्णपणे बरा होऊ शकतो. जिल्ह्यातील नागरिकांनी या मोहिमेत सहभागी होऊन आरोग्य पथकाला सहकार्य करावे, असे आवाहन आरोग्य विभागातर्फे करण्यात आले आहे.

# जिल्हा क्रीडा संकुलात राज्यस्तरीय शालेय शुटींगबॉल स्पर्धांचे आयोजन....

**जनसंचलन/बुलढाणा**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच विदर्भ रिजन शुटींगबॉल असोसिएशन यांच्या तांत्रिक सहकार्याने दि. २ ते ३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल, बुलढाणा येथे राज्यस्तरीय शालेय शुटींगबॉल क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांमध्ये १७ वर्षांखालील मुले व मुली सहभागी होणार असून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून प्रत्येकी १० मुले व १० मुली सहभागी होतील. तसेच प्रत्येक विभागातून पुरुष व महिला संघ व्यवस्थापक, तज्ज्ञ पंचाधिकारी, स्वयंसेवक आदींची उपस्थिती राहणार आहे. स्पर्धांचा उद्घाटन समारंभ दि.२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता जिल्हा क्रीडा संकुल, जांभरून रोड, बुलढाणा येथे आयोजित करण्यात आला आहे. यावेळी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे मान्यवर अधिकारी, जिल्हा क्रीडा परिषदेचे पदाधिकारी, शिवछत्रपती पुरस्कारार्थी, अमरावती विभागाचे क्रीडा उपसंचालक, विदर्भ रिजन शुटींगबॉल संघटनेचे पदाधिकारी, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी तसेच क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. स्पर्धेतील यशस्वी आयोजनासाठी मुलींच्या संघांसाठी नवीन इमारतीत तर मुलांच्या संघांसाठी जुन्या इमारतीत निवास व्यवस्था करण्यात आली आहे. भोजन व्यवस्था देखील जिल्हा क्रीडा संकुल परिसरातच करण्यात येणार आहे. संकुल परिसरात शुटींगबॉलचे दोन अद्ययावत मैदाने तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. स्पर्धा आयोजनासाठी विविध समित्या जसे की आयोजन समिती, तक्रार निवारण समिती, उद्घाटन समिती, तांत्रिक समिती, मैदान व्यवस्था, भोजन, निवास, वैद्यकीय, प्रसिद्धी व स्वच्छता समिती सक्रियपणे कार्यरत आहेत. निवास व्यवस्था व संकुल परिसराची स्वच्छता पूर्ण झाली असून निमंत्रण पत्रिका, प्रमाणपत्रे, भोजन पासेस व इतर दस्तऐवजांचे काम अंतिम टप्प्यात आहे. दरम्यान, दि. २ ते ३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत स्पर्धा असल्याने सैन्य व पोलीस भरती सरावासाठी जिल्हा क्रीडा संकुलातील मैदाने तात्पुरती बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. या स्पर्धांचा आनंद घेण्यासाठी जिल्ह्यातील क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे तसेच स्थानिक शाळांतील विद्यार्थ्यांनीही स्पर्धा पाहण्यासाठी नियोजन करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी केले आहे.

# जिल्ह्यातील किन्होळा, गणेशपुर आणि जानेफळ प्राथमिक आरोग्य केंद्राला राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन पुरस्कार...

## केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी उत्तम सेवा देणाऱ्या चमुचे केले अभिनंदन !

**जनसंचलन/बुलढाणा**

सार्वजनिक आरोग्य सेवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी केंद्र सरकारने सुरू केलेल्या राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकनाची एक यादी नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. या यादीमध्ये राज्यातील ५ प्राथमिक आरोग्य केंद्राचा समावेश आहे. त्यातील ३ प्राथमिक आरोग्य केंद्र हे बुलढाणा जिल्ह्यातील आहे. तर २ प्राथमिक आरोग्य केंद्र धाराशिव(उस्मानाबाद) जिल्ह्यातील आहेत. राष्ट्रीय गुणवत्ता मानांकन प्राप्त करणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील उत्तम आरोग्य सेवा देणाऱ्या सर्वच कर्मचाऱ्यांचे केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी अभिनंदन केले आहे. आरोग्यसेवाची गुणवत्ता सुधारण्याच्या दृष्टिकोनातून केंद्र सरकारच्यावतीने राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन पुरस्कार देण्यात येतात. प्राथमिक आरोग्य सेवा केंद्रात दिले जाणारे तातडीचे उपचार, रुग्ण रेफरचे प्रमाण, प्रसूती, रुग्णांसाठी असलेली आरोग्य सेवा, परिसर स्वच्छता, उद्यान, अत्याधुनिक यंत्रांचा वापर वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती यासह इतर बाबींना केंद्रबिंदु ठेवून पुरस्कारासाठी तपासणी करण्यात येते. ७ जानेवारी ते १८ जानेवारी २०२६ दरम्यान केंद्रीय परीक्षकांनी मुद्देनिहाय तपासणी करुन या संदर्भाचा अहवाल केंद्रीय समितीस सादर केला होता. राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानकांचा एक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. या यादीमध्ये राज्यातील ५ प्राथमिक आरोग्य केंद्राचा समावेश आहे त्यातील ३ प्राथमिक आरोग्य केंद्र हे बुलढाणा जिल्ह्यातील आहे तर दोन धाराशिव( उस्मानाबाद) जिल्ह्यातील आहेत. राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकनामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यामधील प्राथमिक आरोग्य केंद्र किन्होळा, खामगाव तालुक्यामधील प्राथमिक आरोग्य केंद्र गणेशपुर व मेहकर तालुक्यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र जानेफळ, यांचा समावेश आहे. तर धाराशिव जिल्ह्यातील दहिपाल, अनाळा या प्राथमिक आरोग्य केंद्राचा समावेश आहे. राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासक मानांकन मध्ये पुरस्कार प्राप्त करणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर्स व कर्मचाऱ्यांचे केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी अभिनंदन केले आहे.



# अन्न व औषध प्रशासन येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

## माजी सैनिकांचा गौरव, संविधान मूल्यांचा जागर

**जनसंचलन/बुलढाणा**

भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त अन्न व औषध प्रशासन कार्यालय येथे ध्वजारोहण व विविध कार्यक्रमांचे आयोजन करून प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी जिल्ह्यातील माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी सहाय्यक आयुक्त(औषधे) तथा कार्यक्रम अध्यक्ष गजानन प्रल्हाद घिरके यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर तंबाखू मुक्ती शपथ तसेच भारतीय संविधान शपथ घेण्यात आली. संविधानातील मूल्ये अधिक दृढ व्हावीत या उद्देशाने संविधान विषयक गीताचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी शासकीय कर्तव्य निष्ठापूर्वक व सचोटीने पार पाडणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सुभेदार मेजर एकनाथ उबरहंडे, सुभेदार गजानन वैद्य, हवालदार पांडुरंग जाधव, सुभेदार संजय चिंचखेडे, सुभेदार रमेश गवई, सुभेदार अशोक शेळके, सुभेदार गजानन उबरहंडे, नायक बजरंग निकम, नायक त्र्यंबक नेमाने, हवालदार समाधान जाधव व हवालदार संदीप जाधव यांच्यासह अनेक माजी सैनिकांचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी सुभेदार अशोक शेळके व हवालदार संदीप जाधव यांनी सैन्य दलातील अनुभव कथन करून उपस्थितांना प्रेरणा दिली. अन्न व औषध प्रशासन, बुलढाणा यांच्या वतीने उपस्थित सर्व माजी सैनिकांचा जाहीर सत्कार करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. त्यानंतर केमिस्ट व ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष गजानन शिंदे तसेच किराणा दुकानदार असोसिएशनचे अध्यक्ष अमरचंद कोठारी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. अध्यक्षीय भाषणात गजानन प्रल्हाद घिरके यांनी राष्ट्रप्रेम, सैनिकांचा देशासाठी असलेला त्याग, संविधानाचे महत्त्व तसेच जिल्ह्यातील केमिस्ट व ड्रगिस्ट संघटनेचे उल्लेखनीय कार्य यावर सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीकांत मोरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सुरक्षा अधिकारी अक्षय भोपाळे, प्रमुख लिपिक जयंत झोपे, रोखपाल मुकुंद खुर्दे, डेटा एंट्री ऑपरेटर विजय जाधव, आशिष देशमुख, अजाबराव घेवंदे व कारभारी मस्के यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास उपाध्यक्ष, केमिस्ट व ड्रगिस्ट असोसिएशन, राजू पाटील अभिजीत निंबाळकर, गणेश बंगाळे, निलेश गावंडे, रवी वाढते, धर्मेश कमानी, मुंदडा, सोनोने यांच्यासह अनेक औषधी विक्रेते व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## बुलडाण्यात जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न

# सलाहुद्दीन अय्युबी डेव्हलपमेंट ग्रुपच्या वतीने जनजागृती




**जनसंचलन/बुलढाणा**

देशातील अनेक राज्यात कायदा लागू करण्यात आलं आहे. प्रत्येकाला २००२ पूर्वीच्या मतदार यादीत नांव असल्याचं पुरावा द्यावं लागत आहे.हा कायदा महाराष्ट्रात देखील लागू होणार असून त्या पूर्वी सामान्य नागरिकांच्या मनातील भीती दूर करून या कायद्याबाबत जनतेत जागृती व्हावी या उद्देशाने आज शुक्रवारी दुपारी बुलडाणा येथील हुसैनिया मस्जिद समोर सलाहुद्दीन अय्युबी डेव्हलपमेंट ग्रुपच्या वतीने जनजागृती कार्यक्रम उत्साहात घेण्यात आला.यावेळी अनेक नागरिकांना या कायद्याची माहिती देण्यात आली.तसेच या कायद्या बद्दल मनात कोणतीही भीती बाळगू नये व कायदा लागू झाल्यावर देखील सलाहुद्दीन अय्युबी डेव्हलपमेंट ग्रुपच्या वतीने नागरिकांना योग्य ते मार्गदर्शन केले जाईल,अशी माहिती ग्रुपच्या पदाधिकाऱ्यांनी दिली आहे.

# अजितदादांचे बुलढाणा जिल्हा विकासात अमूल्य योगदान...

## सामूहिक श्रद्धांजली सभेत मान्यवरांच्या शोकदग्ध भावना !

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्याच्या सिंचन क्षेत्राला गती देण्यासाठी विविध प्रकल्प पूर्णत्वास आणण्यासाठी, सिंदखेडराजा व शेगाव विकास आराखडा पूर्णत्वास नेण्यासाठी, भोन स्तूप विकसित करण्यासाठी तर नैसर्गिक संकटात आलेल्या शेतकऱ्यांना सावरण्यासाठी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी बुलढाणा जिल्हा विकासासाठी निभावलेली भूमिका ही न विसरण्यासारखी आहे. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्र केवळ थांबला चालू असून २५ वर्षे मागे गेला आहे, अनेक कार्यकर्त्यांचे नेतृत्व त्यांनी घडविले आहे.. अशा शोकदग्ध भावना सर्वपक्षीय व सर्वधर्मीय मान्यवरांनी व्यक्त करत, बुलढाणा येथील गांधी भवनाच्या प्रांगणात शुक्रवारच्या सायंकाळी मावळत्या सूर्याला साक्षी ठेवून अर्पण केली मावळलेल्या नेत्याला भावपूर्ण श्रद्धांजली ! महाराष्ट्राच्या राजकारणात आपल्या कार्यकर्तृत्वाने स्वतंत्र ओळख निर्माण करणारे, कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना आज ३० जानेवारी रोजी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या सामूहिक शोकसभेत विविध पक्षांचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अजितदादांच्या स्मृतींना उजाळा दिला. महाराष्ट्राच्या राजकारणात आपला ठसा उमटविणारे, सर्वसामान्यांचे प्रश्न तळमळीने सोडविणारे नेते म्हणून त्यांचा अनेकांनी उल्लेख कधी करून काही आठवणी सांगितल्या. सर्वप्रथम सहकार नेते डॉ. राजेंद्र शिंगणे व आमदार धर्मवीर संजूभाऊ गायकवाड यांच्याहस्ते अजितदादांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर वकील संघातर्फे ॲड. विजय सावळे, पत्रकारांतर्फे अरुण जैन, मोईन काझी, कुणाल पैठणकर, अनुजाताई सावळे, मंदार बाहेकर, डॉ. राजेश्वर उबरहंडे, लक्ष्मणराव घुमरे, विजय अंभोरे तुकाराम अंभोरे पाटील, आ. धीरज लिंगाडे, आ. संजय गायकवाड, डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी त्यांच्या भावना व्यक्त करून श्रद्धांजली अर्पित केली. आ. संजय गायकवाड यांनी दादांच्या कार्यशैलीचा, नेतृत्वगुणांचा आणि सामान्य कार्यकर्त्यांप्रती असलेल्या आपुलकीचा उल्लेख करत त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. तर डॉ. राजेंद्र शिंगणे अजितदादांशी असलेल्या ३२ वर्षाच्या राजकीय व सामाजिक ऋणानुबंधाचा भावनिक आढावा घेऊन जिल्ह्याचे विकासातील दादांचे योगदान सांगितले.



या श्रद्धांजली सभेस जयश्रीताई शेळके, ओमसिंग राजपूत, नरेश शेळके, मृत्युंजय गायकवाड, अनुजा सावळे, ओमसिंग राजपूत, सुमित सरदार, गजेंद्र दांदडे, जिजाबाई राठोड, मयुरी देशपांडे, संतोष आंबेकर, बाबासाहेब जाधव, ॲड. जयसिंग देशमुख, अनिल वर्मा, प्रा. डी. एस. लहाने, जितेंद्र एन. जैन, दत्ता काकस, दीपक रिंढे, आशिष जाधव, श्रीकांत गायकवाड, विजय राजपूत, रणजितसिंह राजपूत, प्रमिला गवई, श्रीकृष्ण शिंदे यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी, नगरसेवक, उद्योजक, पत्रकार, वकील, डॉक्टर्स व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन अजीम नवाज राही यांनी तर सामूहिक श्रद्धांजलीचे संचलन पत्रकार राजेंद्र काळे यांनी केले. शेवटी उपस्थित सर्वानीस्व. अजितदादा पवार यांना कोटी-कोटी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत मौन बाळगले.

# शेतकरी महिलेस मारहाण, चौघांना शिक्षा



**जनसंचलन/बुलढाणा**

शेतात बळजबरीने घुसून ट्रॅक्टरद्वारे नांगरणी करण्यांना रोखण्यास गेलेल्या शेतकरी महिलेस विळ्यासह लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी बुलढाणा न्यायालयाने चौघांना सहा महिने शिक्षा व प्रत्येकी २ हजार रुपये दंडाची शुक्रवारी (दि. ३०) सुनावली. मुख्य न्यायदंडाधिकारी अमित खंडाळे यांनी हा निर्णय दिला. ही घटना २४ एप्रिल २०२४ रोजी - घडली होती. येळगाव धरणालगत असलेल्या एका महिलेच्या शेतात मच्छिंद्र पवार व अन्य अशा चार जणांनी ट्रॅक्टर घेऊन प्रवेश केला. सोबतच जबरदस्तीने त्यांनी शेतात नांगरणी करण्याचा प्रयत्न केला. शेतकरी महिलेने त्यांना थांबविण्याचा प्रयत्न केला असता सर्व आरोपींनी महिलेस मारहाण केली. दरम्यान, कोथिंबीर विकत घेण्यासाठी आलेल्या भाजीपाला व्यापाऱ्याने मध्यस्थी करून भांडण सोडवले होते. या प्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून बुलढाणा ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली होती. त्यानंतर हे प्रकरण न्यायप्रविष्ट झाले होते. वादी पक्षातर्फे ॲड. हितेश रहाटे यांनी काम पहाले.

# जिल्ह्यात आज कुसुम सर्व्हेक्षण मोहीम कुष्ठरोग निर्मूलनाची शपथ

**जनसंचलन/बुलढाणा**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त केंद्र शासनाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान आणि कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) विशेष सर्व्हेक्षण मोहीम ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. या अभियानाचा एक भाग म्हणून २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून जिल्हाभर कुष्ठरोग निर्मूलनाची शपथ घेण्यात आली. २६ जानेवारी रोजी ध्वजारोहण कार्यक्रमानंतर जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागात शपथ कार्यक्रम पार पडला. यामध्ये सर्व ग्रामपंचायती, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपजिल्हा रुग्णालये, नगरपालिका व महानगरपालिका दवाखाने, शाळा, महाविद्यालये, आश्रमशाळा आणि अंगणवाड्या, शासकीय व निमशासकीय कार्यालय सहभागी झाले होते. ग्रामपंचायत स्तरावर सरपंचांच्या भाषणाचे वाचन करण्यात आले, ज्यामध्ये कुष्ठरोगाचा कलंक पुसून टाकण्याचे आवाहन करण्यात आले. स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान आणि कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) विशेष सर्व्हेक्षण मोहीम ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. या १५ दिवसांच्या पंधरवड्यात आरोग्य विभागामार्फत विशेष सर्व्हेक्षण केले जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने विविध उपक्रमांद्वारे कुष्ठरोगाबद्दलची भीती व गैरसमज दूर करणे. दुर्गम भाग, वीटभट्ट्या, खाणी आणि स्थलांतरित वस्त्यांमध्ये प्रत्यक्ष जाऊन तपासणी करणे. नवीन रुग्ण शोधून त्यांना तात्काळ उपचाराखाली आणणे, जेणेकरून संसर्गाची साखळी खंडित होईल. कुष्ठरोग हा पूर्णपणे बरा होणारा आजार आहे. त्यामुळे या पंधरावड्यात कुष्ठरोग जनजागृती अभियान आणि कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) विशेष सर्व्हेक्षण मोहीम यशस्वीपणे राबविण्याचे आवाहन केले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८